भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १४१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०२/२०१७

**१) महसुल विभागाची ०६ ब्रास रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २५/०२/२०१७ वा. ०४.०० वा. दर. यातील फिर्यादी हे रात्रगस्त पेट्रोलींग दरम्यान पवनी येथे भेट दिली असतांना यातील आरोपी क्र. १ व २ यांनी संगनमताने आपल्या ताब्यातील ट्रक मध्ये महसुल विभागाची ०६ ब्रास रेती किंमती १२,०००/—रु. ची अवैद्य रित्या चोरुन वाहतुक करतांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी रहांगडाले वय ४७ वर्ष, स्था. गु. शा भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. कोडवते पोस्टे पवनी हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन पैशाच्या जुण्या वादावरुन लोखंडी रॉडने व चाकुने मारहान करुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २४/०२/२०१७ चे १८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी जावेद शेख रफीक शेख वय ३० वर्ष, रा. गांधी चौक, गुरजी भाजी भंडारा हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु ६६१६ ने भंडारा कडे येत असतांना यातील तीनही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीला रस्त्यात अडवीले व त्यांच्यातील पैशाच्या जुण्या वादा वरुन फिर्यादीस लोखंडी रॉडने व चाकुने उजवे पायावर व डावे हातावर मारहान करुन गंभीर जखमी केल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. एमएलसी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३४१,३२४,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

**३) संगनमत करुन महीलेस थापडबुक्यांनी मारहान करुन घरातील सामान बाहेर फेकल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २५/०२/२०१७ चे ०६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचे मुलाने आरोपीचे नातेवाईका विरुध्द पो. स्टे. ला तक्रार दिल्या वरुन गुन्हा दाखल झाल्याचे कारणावरुन यातील तीनही आरोपीतांनी फिर्यादीला तीच्या सुनेस थापडबुक्यांनी मारहान करुन तिच्या घरातील सामान बाहेर काढुन फेकल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५२,३२३,५०६,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) हनुमान मंदीरामधुन चांदीचा मुकुटची चोरी . :—**

दिनांक २५/०२/२०१७ चे ०८.०० ते १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी पुरुषोत्तम बाळकृष्ण उकरे वय ५१ वर्ष, रा. राजेद्र वार्ड शुक्रवारी भंडारा हा हनुमान मंदीरा मध्ये येवुन पुजा अर्चना करुन आपले घरी गेला व सायकांळी पुजा अर्चना करीता हनुमान मंदीरा मध्ये आले असता हनुमाणजीचे मुर्तीवर असलेला चांदीचा मुकुट वनज ४४० ग्रॅम किंमती अंदाजे ५,०००/—रु. चा दिसुन आला नाही कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

५) दारूडया वाहन चालकावर कारवाई:—

दिनांक २५/०२/२०१७ चे १७.३० ते १८.०० वा. दरम्यान यातील आरोपी हा आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३१ बीझेड चा चालक हा दारु पिऊन दारुचे नशेत मिळुन आल्याने आरोपी चालकाचे दारु पिल्या बाबत ग्रा. रु. पवनी येथुन एमएलसी करुन रिपोर्ट वरुन पोस्टे पवनी येथे कलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

६) अवैध दारु/ जुगार अडयांवर धाडी . :—

दिनांक २५/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. साकोली, अडयाळ, भंडारा येथे अवैध दारू/ जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ०३ लिटर २२० मिली लिटर देशी/ विदेशी दारु किंमती १,२३०/—रु. चा माल तसेच जुगारातुन किंमती ३१५/—रु. जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.